Maharashtra State Board ofSecondary
& Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 1114
दिनांक :- 27 MAR 2025

प्रति,
मुख्याध्यापक आणि प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- फेब्रु-मार्च २०२५ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांबाबत..**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दिनांक २०/१२/२०१८
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दिनांक २५/०१/२०१९
३) क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/५५३ दिनांक ११/०२/२०२५ रोजीचे पत्र
४) क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/७५० दिनांक २४/०२/२०२५ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.४ च्या पत्रान्वये फेब्रु-मार्च २०२५ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आपले सरकार पोर्टलवर URL:https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे विद्यार्थी/ शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे पाठवायचे आहेत.

प्रस्ताव सादर केल्यानंतर भरावयाच्या छाननी शुल्काबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी, **आपले सरकार पोर्टल वर प्रोसेसिंग फी रु.२३.६०/- ऑनलाईन व्दारे भरण्यात यावी**. आणि सदर पोर्टलवर अर्ज पाठविल्यानंतर सोबतच्या प्रपत्रामध्ये संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची परीपूर्ण माहिती भरुन प्रति विद्यार्थी **रु.२५/- (रु.पंचवीस फक्त) प्रमाणे छाननी शुल्क विभागीय मंडळ कार्यालयास रोखीने/ चलनाने/ ऑनलाईन भरणा करुन पावती मंडळ कार्यालयास दि.१५/०४/२०२५ पूर्वी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या पत्रासह सादर करण्यात यावी.** तद्नंतरच सदर प्रस्तावांवर मंडळ कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच संदर्भिय शासन निर्णय क्र.१ परिशिष्ट-८ मध्ये नमुद नमुन्यामध्ये एन.सी.सी. करीता सहभागी विद्यार्थी आणि परिशिष्ट-९ मध्ये नमुद नमुन्यामध्ये स्काऊट गाईड करीता सहभागी विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळ कार्यालयात पत्रासह प्रचलित पध्दतीने दि.१५/०४/२०२५ पर्यंत हस्तपोहोच सादर करावेत. सदर प्रस्तावांसोबत संबंधित विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेमार्फत सादर करणे बंधनकारक आहे.

अपूरी कागदपत्रे अथवा छाननी शुल्क अभावी विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी. निकाल जाहिर झाल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याचा गुण सवलतीचा प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत:-** १) खेळाडू विद्यार्थी प्रस्तावाकरिता प्रपत्र नमुना
२) एन.सी.सी. आणि स्काऊट गाईड करीता सहभागी विद्यार्थी प्रस्तावाकरिता संदर्भिय शासन निर्णय क्र.१ मध्ये नमुद परिशिष्ट-८ व ९

प्रपत्र क्र.१

क्रीडा स्पर्धेत सहभागी झाल्याचे विद्यार्थी / विद्यार्थिनिचे हमीपत्र.

मी खाली सही करणार कुमार /कुमारी .................................................. लिहुन देतो /देते की , मी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणा-या फेब्रुवारी/मार्च २०१.. च्या परिक्षेत माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत प्रविष्ठ होत असुन मी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात पार पडलेल्या .................... या खेळाच्या राज्य/राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत घेतला आहे.सदर क्रीडा स्पर्धेतील सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र मी सोबत जोडत आहे,त्यानुसार मला नियमानुसार क्रीडा स्पर्धेतील सहभागाबद्दल मिळणारी क्रीडागुण सवलत मिळणेबाबतची विनंती आहे.

१. नांव ....................................

२. बैठक क्रमांक ........................ ३. शाळा/क.महाविदयालय क्रमांक .................

४. खेळप्रकार............................ ५. स्पर्धेचा स्तर ....................................

६. क्रीडा स्पर्धा आयोजक ..........................

७. स्पर्धा कालावधी .................. ते ..................

८. स्पर्धा आयोजन स्थळ.................

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आणि सत्य असुन चुकीची आढळल्यास होणा-या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

खेळाडूची स्वाक्षरी.

प्रपत्र - २

वरील उल्लेखीत विद्यार्थी/विद्यार्थीनि आमच्या प्रशालेतील असून तो/ती इयत्ता १०/१२ वी च्या वर्गात शिकत आहे. त्यांनी वरिल नमूद केलेली माहिती मुळ प्रमाणपत्रासह तपासण्यात आली असुन क्रीडा गुण सवलत मिळणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

क्रीडा शिक्षक नाव व स्वाक्षरी

मुख्याध्यापक/प्राचार्य सही व
शाळा/क.महाविद्यालय शिक्का

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२

दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट -८

प्रजासत्ताक दिन संचलन- राष्ट्रीय स्तर शिबीरात सहभाग घेतलेल्या /त्यामधील संलग्न स्पर्धांमध्ये पदकविजेते झालेल्या तसेच आंतरराष्ट्रीय युथ एक्सचेंज प्रोग्रॅम मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत सवलत गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

जिल्हा :-

शिबीराचे नांव :-

शिबीर कालावधी :-

शिबीर ठिकाण :-

| अ. क्र. | विदयार्थ्याचे पूर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

(स्वाक्षरी व शिक्का)

समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना.

**********

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२

दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट -९

आंतरराष्ट्रीय स्तर जांबोरी शिबीर तसेच राष्ट्रपती पदक प्राप्त केलेल्या स्काउट व गाईड विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत सवलत गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

जिल्हा :-

शिबीराचे नांव :-

शिबीर कालावधी :-

शिबीर ठिकाण :-

| अ. क्र. | विदयार्थ्याचे पुर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

(स्वाक्षरी व शिक्का)

जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट व गाईड